महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.
पुणेविभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX- 020/25536761 |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / | E-MAIL - sscboardpune@gmail.com<br>Website- www.sscboardpune.in |


जा.क्र पुविमं/माध्य शाखा क/ 4661
पुणे–४११००५
दिनांक :१५ /०६/२०२६

प्रति,

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या मूल्यमापनाचा निकाल जाहीर करणेबाबत.

संदर्भ : राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/मुविमं/२४२०, दि.१०/०६/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी) व उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी) मूल्यमापन सत्राचा निकाल ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येणार असून, त्याबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनबाबत मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी नोंद घेवून त्याप्रमाणे पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही करावी. तसेच सदर बाब सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे निदर्शनास आणून दयावी व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

MBRaut
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –
१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
२ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे / अहिल्यानगर / सोलापूर

प्रत माहितीस्तवः– मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे ४११००४

## प्रकटन

एप्रिल,२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५वी व इयत्ता ८वीच्या मूल्यमापनाचा निकाल जाहीर करणेबाबत...

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे,नागपूर,छत्रपती संभाजीनगर,मुंबई, कोल्हापूर,अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळामार्फत इयत्ता ५वी प्राथमिक स्तर व इयत्ता ८वी उच्च प्राथमिक स्तराच्या मूल्यमापनासाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांसाठी दिनांक १५/०४/२०२६ ते दिनांक २५/०४/२०२६ या कालावधीत मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर मूल्यमापनाचा निकाल www.msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर दिनांक ११/०६/२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजता जाहीर करण्यात येत आहे.

सदर संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी दर्शविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सदर माहितीची प्रिंट (printout) घेता येईल. पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे इयत्ता ५वी/ इयत्ता ८वीची अर्हता व विद्याविषयक कौशल्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र यथावकाश वितरित करण्यात येईल.

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय
मंडळ, पुणे.

Scanned with OKEN Scanner